खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन

भांडवल निर्मिती जीडीपीच्या ३४ टक्क्यांच्या पुढे : सीतारामण

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सरकारने खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक भांडवली खर्च जाणीवपूर्वक वाढवला. त्याचा परिणाम आता वाढलेली भांडवल निर्मिती, उत्पादन क्षेत्रातील उत्पादन क्षमतेचा चांगला वापर आणि उद्योगांना वाढलेले बँक कर्ज या स्वरूपात दिसून येत आहे, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी मंगळवारी सांगितले. उल्लेखनीय म्हणजे सरकारने २०२६-२७ मध्ये भांडवली खर्च १२ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढवला आहे. जेव्हा केंद्र सरकार भांडवली मालमत्तेच्या बांधकामासाठी राज्यांना दिलेल्या अनुदानाचा समावेश करते, तेव्हा प्रभावी भांडवली खर्च १७ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. सीतारामण यांनी येथे एआयएमए (ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन) च्या एका कार्यक्रमात सांगितले की, सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे खासगी गुंतवणूक आकर्षित करण्याचा परिणाम आता दिसून येत आहे, कारण २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत एकूण स्थिर भांडवल निर्मिती सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ३४ टक्क्यांपेक्षा जास्त झाली आहे. वास्तविक पाहता, त्यात सुमारे १२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरम्यान, उत्पादन क्षेत्रातील उत्पादन क्षमतेचा वापर ७५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. त्या म्हणाल्या, दुहेरी ताळेबंदाच्या समस्येचे निराकरण झाल्यामुळे आर्थिक घडामोडींना गती मिळाली आहे. ही एक अशी आर्थिक समस्या आहे, त्यात मोठ्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या कंपन्यांचा ताळेबंद आणि बुडीत कर्जांमुळे प्रभावित झालेल्या बँकांचा ताळेबंद एकमेकांवर परिणाम करतात. यामुळे दोघांचीही आर्थिक स्थिती कमकुवत होते आणि एकूण आर्थिक घडामोडींवर परिणाम होतो. भारत आता 'दुहेरी ताळेबंदाच्या फायद्याच्या' स्थितीत आहे, जिथे व्यावसायिक बँकांकडे कर्ज देण्यासाठी पुरेशी तरलता आहे, तर कंपन्या गुंतवणूक करण्याच्या स्थितीत आहेत. उद्योगांना मिळणाऱ्या बँक कर्जातही वाढ झाली असून, जून २०२६ पर्यंत त्यात वार्षिक १९ टक्के वाढ झाली आहे. सीतारामण म्हणाल्या की, जुलै २०२४ मध्ये सत्तेवर परतल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात सुधारणा आणि आर्थिक घडामोडींना चालना देण्यावर भर देण्यात आला, ज्यामुळे अखेरीस रोजगार आणि उपजीविकेच्या संधी वाढल्या. या धोरणामुळे जागतिक आव्हाने आणि जागतिक विकासातील मंदी असूनही भारताला आर्थिक वाढ आणि सामर्थ्य टिकवून ठेवण्यास मदत झाली आहे.





व्यावसायिक क्षेत्राला या संधीचा फायदा घेण्याचे आवाहन

अर्थमंत्री म्हणाल्या, गरजू क्षेत्रांपर्यंत कर्ज पोहोचत आहे आणि सरकारचा मुक्त व्यापार करार भारताच्या श्रम-केंद्रित वस्तू आणि सेवांसाठी नवीन बाजारपेठा खुल्या करत आहेत. त्यांनी व्यावसायिक क्षेत्राला या संधीचा फायदा घेण्याचे आवाहन केले. सीतारामण यांनी भारताच्या पायाभूत सुविधा आणि मालवाहतूक व परिवहन प्रणालीमधील सुधारणांवरही प्रकाश टाकला. कामांच्या जलद गतीने पूर्ण झाल्यामुळे दीर्घकाळ चाललेल्या प्रशासकीय दिरंगाई बद्दलची धारणा बदलण्यास मदत झाली आहे. गेल्या दशकात प्रमुख बंदरांवरील जहाजांच्या परतीचा सरासरी कालावधी जवळपास निम्म्याने कमी झाला आहे. रेल्वे नेटवर्कचे जवळजवळ पूर्णपणे विद्युतीकरण झाले आहे आणि मालवाहतूक विक्रमी १.६७ अब्ज टनांपर्यंत वाढली आहे. सीतारामण यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या व्यापक विस्ताराचीही नोंद घेतली.

भारत संरचनात्मक परिवर्तनाच्या टप्प्यावर

- भारत संरचनात्मक परिवर्तनाच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. उपभोग वाढीचा पुढील टप्पा अशा उत्पन्न गटांच्या वाढीमुळे प्रेरित होईल, जिथे अनावश्यक खर्च वेगाने वाढतो.
- जागतिक आर्थिक वाढ तीन टक्क्यांपेक्षा कमी असूनही, भारतीय अर्थव्यवस्था सुमारे आठ टक्के दराने वाढत आहे. नुकतेच जाहीर झालेले तिमाही आकडेही बहुतांश अंदाजांपेक्षा चांगले आहेत.
- ही स्थूल आर्थिक स्थिरता भारताकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन बदलत आहे. २ सप्टेंबर रोजी जपान क्रेडिट रेटिंग एजन्सीने भारताचे दीर्घकालीन परकीय चलन आणि स्थानिक चलन जारीकर्ता रेटिंग 'बीबीबी+' वरून 'ए-मायनस' पर्यंत स्थिर दृष्टिकोनासह श्रेणीसुधारित केले आहे.



खनिज विनिमय केंद्र सुरू होण्याची शक्यता

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारताचे पहिले खनिज विनिमय केंद्र पुढील आर्थिक वर्षापर्यंत नोंदणीकृत होऊन कार्यान्वित होऊ शकते, असे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले. खाण मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव वीणा कुमारी दरमल यांनी फेडरेशन ऑफ इंडियन मिनरल इंडस्ट्रीज (एफआयएमआय) च्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगितले की, नोंदणी प्रक्रिया सुरू असून, पहिले खनिज विनिमय केंद्र पुढील आर्थिक वर्षापर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. त्या म्हणाल्या की, हे विनिमय केंद्र खनिजांसाठी एक पारदर्शक, इलेक्ट्रॉनिक आणि वितरण-आधारित व्यापार मंच उपलब्ध करून देईल. त्यामुळे बाजार-आधारित किंमत निश्चितीला प्रोत्साहन मिळेल आणि उत्पादक व खरेदीदार यांच्यातील माहितीची विषमता कमी होईल. मंत्रालयाने जूनमध्ये 'खनिज विनिमय नियम, २०२६' अधिसूचित केले आहेत. पारदर्शक किंमत निश्चिती आणि खनिजांच्या प्रमाणित गुणवत्ता मूल्यांकनासह एक आधुनिक मंच तयार करणे, हे या नियमांचे उद्दिष्ट आहे. दरमल म्हणाल्या की, बाजारातील फेरफार रोखण्यासाठी आणि व्यापारात सहभागी असलेल्या पक्षांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी खनिज विनिमय केंद्रात एक जोखीम व्यवस्थापन प्रणाली देखील असेल. यामुळे उत्पादक आणि खरेदीदारांना खनिजांसाठी एक विश्वसनीय आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बाजारपेठ उपलब्ध होईल. खनिजे ही पायाभूत सुविधा, उत्पादन आणि राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेचा कणा आहेत. विकसित भारत २०४७ च्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करताना, आत्मनिर्भर अर्थव्यवस्था उभारणे हे देशाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

आर्थिक वाढ मंदावणार

डीबीएस : वाढत्या चलनवाढीचा दबाव

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. कठीण आर्थिक परिस्थिती, ऊर्जेच्या वाढत्या किमती आणि प्रतिकूल आधार परिणामामुळे चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या उत्तरार्धात भारताची आर्थिक वाढ काही प्रमाणात मंदावू शकते, असे डीबीएस बँकेच्या अर्थतज्ज्ञ राधिका राव यांनी हे सांगितले. त्यांनी पुढे सांगितले, वाढत्या चलनवाढीच्या दबावामुळे चलनविषयक धोरणाचा मुख्य भर किंमत स्थिरतेवर राहू शकतो. स्थूल आर्थिक दृष्टिकोनाच्या आपल्या मूल्यांकनात, डीबीएस बँकेच्या वरिष्ठ अर्थतज्ज्ञ आणि कार्यकारी संचालक राव म्हणाल्या की, मजबूत देशांतर्गत मागणी, उपभोग, सार्वजनिक भांडवली खर्च आणि उत्पादन यांच्या जोरावर पहिल्या तिमाहीत अर्थव्यवस्था ७.८ टक्के वार्षिक दराने वाढली, त्यामुळे भारताला २०२६-२७ या आर्थिक वर्षाची दमदार सुरुवात मिळाली आहे. संपूर्ण आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी आर्थिक वाढ सरासरी ७.३ टक्के राहील.



प्रदर्शनात २०० तांदळाच्या जाती

भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषदेत (बीआयआरसी) जगभरातील व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या तांदळाच्या सुमारे २०० जाती प्रदर्शनात ठेवल्या जाणार आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच जागतिक संग्रह पुढील महिन्यात नवी दिल्लीत आयोजित केला जाईल. यामुळे आंतरराष्ट्रीय खरेदीदारांना एकाच ठिकाणी तांदळाच्या विविध जातींची तुलना करण्यास आणि संभाव्य पुरवठादार ओळखण्यास मदत होईल. आयोजकांनी एका निवेदनात म्हटले आहे की, २३ ते २५ ऑक्टोबरदरम्यान भारत मंडपम येथे प्रदर्शित होणाऱ्या या जागतिक तांदूळ संग्रहात इटलीचा आर्बोरिओ, थायलंडचा जास्मिन आणि ग्लुटिनस आरडी६, आणि जपानचा सुशी राइस यांपासून ते भारताचा बासमती, सुगंधी पारंपरिक धान्ये, काळा आणि लाल तांदूळ, तसेच प्रादेशिक विशिष्ट जातींपर्यंत सर्वांचा समावेश असेल.

महाराष्ट्रातील आंबेमोहर तांदळाचा समावेश

पीआर-११, पीआर-१४, परमल आणि सोना मसुरी यांसारख्या गैर-बासमती जातींचेही प्रदर्शन केले जाईल. यात छत्तीसगडमधील दुबराज, पश्चिम बंगालमधील तुलेपंजी, मणिपूरमधील चक-हाओ काळा तांदूळ, महाराष्ट्रातील आंबेमोहर यांसारख्या प्रादेशिक जातींचाही समावेश असेल.

Short News

पोलादाच्या किमती उच्चांकावर

दिल्ली. कच्च्या मालाच्या, विशेषतः कोकिंग कोलच्या वाढत्या किमती आणि मान्सूननंतर वाढलेल्या मागणीमुळे देशांतर्गत पोलादाच्या किमती चार वर्षांच्या उच्चांकावर पोहोचल्या आहेत, असे बिगमिंटच्या अहवालातून स्पष्ट झाले.

शेअर

बीएसई | ७४,५२९.०८ (▼३२९.९१)

निफ्टी | २३,३२९.०० (▼८५.३०)

सोने चांदी

सोने स्टॅंडर्ड (१० ग्रॅम) मुंबई १,५२,७८४(▼) जळगाव १,५२,७८४(▼)

चांदी (प्रतिकिग्रॅ) मुंबई २,३९,०४४(▼) जळगाव २,३९,०४४(▼)

₹/डॉलर (प्रति डॉलर) ९५.५२

कच्चे तेल (प्रति बॅरल) ९८.७२

२५ हजार कोटींच्या सिक्युरिटीजची विक्री

बँकिंगमधील अतिरिक्त तरलता कमी होणार

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. बँकिंग प्रणालीतील अतिरिक्त तरलता कमी करण्यासाठी आरबीआयने खुल्या बाजार व्यवहारांतर्गत सरकारी सिक्युरिटीजच्या विक्रीच्या दुसऱ्या टप्प्यात २५ हजार कोटींच्या बोली स्वीकारल्या आहेत. आरबीआयनुसार, ६.१० टक्के जीएस २०३१ च्या विक्रीसाठी ११,५१२ कोटी रुपये, ७.९५ टक्के जीएस २०३२ साठी ८,७५८ कोटी रुपये, ६.७५ टक्के जीएस २०२९ साठी २,३०० कोटी रुपये, ७.१७ टक्के जीएस २०३० साठी २,२५० कोटी रुपये आणि ७.१७ टक्के जीएस २०२८ साठी १८० कोटी रुपयांच्या बोली स्वीकारण्यात आल्या. तथापि, ८.२८ टक्के जीएस २०२७ च्या विक्रीसाठी कोणतीही बोली स्वीकारण्यात आली नाही. बँकिंग प्रणालीमध्ये अतिरिक्त तरलता असताना ही ओएमओ विक्री होत आहे. आरबीआयच्या आकडेवारीनुसार, २० सप्टेंबरपर्यंत बँकिंग प्रणालीमध्ये अंदाजे ६.०५ लाख कोटी रुपयांची अतिरिक्त तरलता होती. ओएमओ विक्रीमध्ये बँका व इतर गुंतवणूकदार सरकारी रोखे खरेदी करण्यासाठी आरबीआयला निधी पुरवतात, ज्यामुळे बँकिंग प्रणालीमधून रोख रक्कम कमी होते. मध्यवर्ती बँकेने सध्याची तरलतेची परिस्थिती हाताळण्यासाठी तीन टप्प्यांमध्ये एकूण १ लाख कोटींच्या ओपन मार्केट ओनरशिप विक्रीची घोषणा केली होती.

बांधिलकी : शरद पवार सरसावले; वारसा जपणे काळाची गरज



टाटा समूहाची मालकी रचना अबाधित ठेवावी

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. टाटा समूहाचा सामाजिक बांधिलकीचा वारसा आणि मूल्याधिष्ठित कारभार कायम ठेवणे ही काळाची गरज आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले. उद्योगातून निर्माण होणारी संपत्ती पुन्हा समाजहितासाठी वापरली जावी, हा जमशेदजी, दोराबजी आणि रतन टाटा यांनी पुढे नेलेला विचार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पवारांनी म्हटले की, कॉर्पोरेट गव्हर्नन्सची प्रक्रिया कंपनीच्या उपनियमांनुसार चालणे अपेक्षित आहे. टाटा समूहाची संस्थात्मक रचना आणि मूल्याधिष्ठित वारसा जपणे ही केवळ समूहाची नव्हे, तर त्याच्या सामाजिक योगदानाशी संबंधित जबाबदारी आहे.

लोककल्याणकारी उद्देशांना समर्पित



टाटा समूहाची मालकी कोणत्याही एका व्यक्तीकडे न राहता व्यवसायातील बहुतांश भागीदारी लोककल्याणकारी उद्देशांना समर्पित असलेल्या ट्रस्टकडे आहे. टाटा सन्सच्या मालकीत ट्रस्ट्सचा मोठा वाटा असून, या रचनेमुळे उद्योगातून मिळणारा लाभ आरोग्य, शिक्षण, संशोधन आणि ग्रामीण उपजीविकेसारख्या क्षेत्रांसाठी उपलब्ध होतो.

– **शरद पवार**, अध्यक्ष, राकाँ पवार गट

देशनिहाय 'स्कील पासपोर्ट' तयार करावा!

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. जागतिक रोजगाराच्या बदलत्या गरजांनुसार महाराष्ट्रातील युवक-युवतींना कौशल्य आणि भाषा प्रशिक्षण देऊन आंतरराष्ट्रीय रोजगारासाठी सक्षम करण्यात येत आहे. विविध देशांची कुशल मनुष्यबळाची गरज ओळखून देशनिहाय 'स्किल पासपोर्ट' तयार करावा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अन्य प्रशिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम अद्ययावत करावा, महाराष्ट्रासाठी जागतिक कार्यबल गतीशिलता धोरणातंर्गत परदेशातील रोजगारासाठी सुरक्षित भरती व्यवस्था विकसित करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलतेवरील एकदिवसीय परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जागतिक स्तरावरील बदलती लोकसंख्या आणि वाढते वृद्धत्व यामुळे कुशल मनुष्यबळाची मागणी आहे. महाराष्ट्रातील तरुणांना परदेशातील रोजगार संधी सुलभ व्हाव्यात आणि भाषिक अडचणी दूर व्हाव्यात यासाठी केंद्र शासनाचा डिजिटल इंडिया भाषिणी, मित्रा आणि 'महिमा यांनी सामंजस्य करार केला.

९० वर्षे जुन्या सुलेमान मिठाईवाल्यावर ॲक्शन!

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मोहम्मद अली रोडवरील प्रसिद्ध सुलेमान उस्मान मिठाईवाला या सुमारे ९० वर्षांची परंपरा असलेल्या मिठाई दुकानावर अन्न व औषध प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. तपासणीत अन्न तयार करण्याच्या आणि साठवणुकीच्या ठिकाणी गंभीर स्वच्छता त्रुटी आढळल्याने प्रशासनाने दुकानाचा अन्न व्यवसाय परवाना तत्काळ निलंबित केला. १९३६ मध्ये पूर्ण स्वरूपातील दुकान सुरू झाल्याची माहिती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर आहे. मात्र हे दुकान १९२६ मध्ये सुरू झाले होते. एफडीएच्या तपासणीत अन्न तयार करण्याचे व साठवणुकीचे क्षेत्र जलनिस्सारण वाहिन्या, सांडपाणी वाहिन्या आणि कचरा साठवणुकीच्या जागेपासून आवश्यक अंतर व भौतिक विभाजनाशिवाय असल्याचे आढळले. झाकण नसलेल्या ड्रेन्समुळे कीटक आणि सांडपाण्याशी संबंधित दूषित घटक अन्नाच्या संपर्कात येण्याचा धोका असल्याचे प्रशासनाने नमूद केले.

सुलेमान उस्मान मिठाईवाल्यासह मुंबईतील 'स्वीन्स्टा'च्या स्वीगी इंस्टमार्ट डार्क स्टोअरचा परवानाही तात्काळ निलंबित करण्यात आला. येथे जिवंत उंदीर, कुरतडलेल्या तांदळाच्या पिशव्या, उंदरांच्या विष्ठेच्या खुणा, झुरळे, माश्या तसेच अस्वच्छ रेफ्रिजरेशन युनिट आढळले. मुंबईतील एकूण १० ठिकाणी परवाना निलंबन अथवा नियमानुसार कारवाई करण्यात आली.

उत्तर पश्चिम रेल्वे

ई-निविदा आमंत्रण सूचना

पत्र क्र. डब्ल्यू-बी-७४-डब्ल्यू-ओ/वर्क्स/एनआयटी/एक्स दिनांक : १७.०९.२०२६ रेल्वे मंडळ व्यवस्थापक, अभियांत्रिकी, उत्तर पश्चिम रेल्वे, जोधपूर यांच्याकडून भारताच्या राष्ट्रपतींसाठी व त्यांच्या वतीने, प्रचलित नियमांनुसार निर्धारित नमुन्यात ई-निविदेद्वारे खालील कामांसाठी अनुक्रमे निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा सूचना क्र. : १४८ ऑफ २०२६-२७ कामाचे नाव व ठिकाण : जोधपूर विभागातील हरालया बॅलास्ट डेपो येथे ६५ मि.मी. गेज मशीन-क्रश्ड रेल्वे ट्रॅक बॅलास्टचा ढिगामध्ये पुरवठा करणे तसेच तोच बॅलास्ट रेल्वे बॅलास्ट हॉपरमध्ये भरणे. अंदाजित किंमत : रुपये २३,८३,०२,५७९.६० इसारा रक्कम : रुपये ४७,६६,१००.०० ई-निविदा सूचना क्र. : १५१ ऑफ २०२६-२७ कामाचे नाव व ठिकाण : एडीईएन/जेएसएम यांच्या अखत्यारीतील जुन्या/जीर्ण झालेल्या निवासस्थानांच्या जागी टाइप-II ची १७ युनिट्स आणि टाइप-IV चे १ युनिट निवासस्थान बांधणे. अंदाजित किंमत : रुपये ४,५०,३४,९१७.७० इसारा रक्कम : रुपये ९,००,७००.०० ई-निविदा सूचना क्र. : १५४ ऑफ २०२६-२७ कामाचे नाव व ठिकाण : झोन करार (गवंडी व रंगकाम) – झोन २ : एसएसई/डब्ल्यू/बी/जेयू यांच्या विभागातील सेवा इमारती, म्हणजेच आरकेबी स्टेशन, पार्सल कार्यालय, एचआरडी प्रशिक्षण केंद्र, रेल्वे संस्था, पीआरएस, ओआरएच, एसआरएच, वरिष्ठ एसआरएच, एमएस कार्यालय, पीडब्ल्यूआय कार्यालय, लोको कार्यालय, डीआरएम कार्यालय, एओटीए कार्यालय, बीआरआय कार्यालय, पाणीपुरवठा संकुल आणि जेयू येथील इतर सेवा इमारती, या एडीईएन/मुख्यालय/जेयू यांच्या अखत्यारीत २०२६-२७ आणि २०२७-२८ या वर्षांसाठी, अंदाजित किंमत : रुपये २,१२,८७,०१२.६९ इसारा रक्कम : रुपये ४,२५,८००.०० ई-निविदा सूचना क्र. : १५५ ऑफ २०२६-२७ कामाचे नाव व ठिकाण : उत्तर पश्चिम रेल्वेच्या जोधपूर विभागातील स्टेशन परिसर, रेल्वे वसाहत परिसर आणि मधल्या विभागातील जमिनीचे रेल्वेच्या नावे नामांतरण करण्यासह भू-आराखड्याचे अद्ययावतीकरण, ताळमेळ, प्रमाणीकरण आणि संगणकीकरण करणे. अंदाजित किंमत : रुपये २,३४,८३,७२७.५१ इसारा रक्कम : रुपये ४,६९,७००.०० निविदा सूचना क्र. १४८ ऑफ २०२६-२७ साठी ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १२/१०/२०२६, निविदा सूचना क्र. १५१ ऑफ २०२६-२७ साठी ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०८/१०/२०२६, निविदा सूचना क्र. १५४ ऑफ २०२६-२७ साठी ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०८.१०.२०२६, तसेचनिविदा सूचना क्र. १५५ ऑफ २०२६-२७ साठी ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०९.१०.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत आहे. ई-निविदा पाहण्यासाठी आणि भरण्यासाठी वेबसाइट : www.ireps.gov.in

1357-CQ/26

/NWRailways /NWRailways_ पर फॉलो करें

'लालबाग राजा'च्या दर्शनाचे आमिष

चार भाविकांची फसवणूक : आरोपीला ठोकल्या बेड्या

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. गणेशोत्सवादरम्यान प्रसिद्ध लालबागच्या राजाच्या व्हीआयपी 'चरण स्पर्श' दर्शनाचे आमिष दाखवून चार भाविकांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात काळाचौकी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत प्रणव सुरेश कुमार यादव (१९) या आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी लागलेल्या भल्यामोठ्या रांगेतून वाचून लवकर दर्शन घेण्याच्या प्रयत्नात असलेले भाविक या ठगाच्या जाळ्यात अडकले. मॅग्नम टॉवर गेटजवळ आरोपी प्रणवची भेट वांद्रे येथील रहिवासी इक्बाल मन्सूरी आणि त्यांच्या मित्रांशी झाली. आरोपीने प्रतिव्यक्ती ८५० रुपये याप्रमाणे एकूण ३,४०० रुपयांमध्ये थेट 'चरण स्पर्श' दर्शन घडवून देण्याचे खोटे आश्वासन दिले. भाविकांनी त्याच्यावर विश्वास ठेवून ८०० रुपये ऑनलाईन स्कॅनरद्वारे, तर २,६०० रुपये रोख स्वरूपात दिले.

भाविकांनी एजंटच्या आमिषाला बळी पडू नये!

आरोपीची विचारपूस केली असता, आपल्याकडे दर्शनासाठी कोणताही पास किंवा व्यवस्था उपलब्ध नसल्याची कबुली आरोपीने दिली. भाविकांनी आरोपीला तत्काळ काळाचौकी पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी कोणतीही पेड किंवा सशुल्क सेवा अधिकृत नसून, भाविकांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्ती किंवा एजंटच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलीस आणि मंडळ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जोखमीच्या गर्भवतींचा मोठ्या रुग्णालयांवर भार

राम खांदारे । नवराष्ट्र मोठ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये सिझेरियन प्रसूतीचे प्रमाण ५० ते ६० टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे दिसून येत आहे. मात्र, या आकडेवारीचा थेट अर्थ या रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनावश्यक सिझेरियन होत असल्याचा अर्थ काढता येणार नाही. कारण लहान रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच खासगी रुग्णालयांमधून गंभीर आणि गुंतागुंतीच्या उपचारांसाठी मोठ्या रुग्णालयांकडे पाठवले जाते. त्यामुळे या रुग्णालयांतील सिझेरियनचे प्रमाण आहे. सिझेरियन ही गरजेनुसार केली जाणारी शस्त्रक्रिया असली तरी त्याचे काही धोके आहेत. 'सिझेरियनमध्ये रक्तस्राव, संसर्ग आणि भूल देताना होणाऱ्या गुंतागुंतीचा धोका असतो.

जाहीर नोटीस

या द्वारे सर्व संबंधितांस जाहीर नोटीस देण्यात येत आहे की, मौजे पोमगांव, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन मिळकत येणेप्रमाणे

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे आर-प्रति	विक्री केलेले क्षेत्र हे आर-प्रति	आकार रु-पै.
३१०	-	४-१५-०० पो.ख. १-३९-००	०-४०-००	००-१६

अशी वर उल्लेखित जमीन ही जमीन मालक श्री. सतिश टि. भाटीया यांचे मालकीची असून ७/१२ उता-यावर त्यांचे नाव आहे. वरील जमिन मालक श्री. सतिश टि. भाटीया यांनी वरील जमीनीतील त्यांचे मालकीचे हे ०-४० -०० आर क्षेत्र आमचे अशिलांस कायम विक्री करण्याचे मान्य व कबूल केले आहे. तरी सदरहू मिळकतीवर वा तिच्या एकाद्या भागावर कोणाही इसमाचा वा संस्थेचा, विक्री, गहाणवट, ताबा, भाडेपट्टा, कूळ, दावा, वहिवाट वगैरे हक्काने कायदेशीर बोजा असल्यास तो त्यांनी सदरहू नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या दिवसापासून (१४) चौदा दिवसांच्या आत निम्नलिखित स्वाक्षरीकारांना त्यांच्या खालील पत्त्यावर सर्व त्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह सुचीत करावे अन्यथा सदरहू वर उल्लेखित मिळकतीवर वरीलप्रमाणे कोणाचाही कसल्याही प्रकारे कायदेशीर हक्क नाही, असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक २३/०९/२०२६

सही/-
हेमंत पाटील अँण्ड असोसिएट्स
वकील व कायदेशीर सल्लागार
१०५, परिश्रम सोसायटी, १ला मजला, मामल क्लासेसच्या बाजुला, शहाड स्टेशनजवळ, शहाड (प.), ता. कल्याण, जि. ठाणे.
पिन : ४२११०३. मो. ९९६७२ १९०३३/९२२३८१३०८८

महावितरण **ई-निविदा सूचना**

महावितरणकडे नोदणीकृत असलेल्या नामांकित व अनुभवी पुरवठादार व कंत्राटदार यांचे कडून पिंपरी विभागा अंतर्गत खालील सामानांचा पुरवठा/कामे करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा क्रं. का.अ./पिंपरी/२६-२७	कामाचा तपशील	निविदा रक्कम रू.
टी-०६	महावितरण पिंपरी विभाग अंतर्गत सर्व कार्यालयाच्या ईमारती व आजूबाजूचा परिसर स्वच्छतेची वार्षिक कामे पुरविण्याकरता.	१० लाख

अधिक तपशीलासाठी कृपया https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळाला भेट द्यावी.

पी. आर. ओ. क्रं.१३८/२०२६-२७ — कार्यकारी अभियंता, पिंपरी विभाग

शुद्धिपत्रक

दैनिक नवराष्ट्र या वृत्तपत्रांमध्ये पुणे आवृत्तीत दि १६ सप्टेंबर २०२६ रोजी पान क्रमांक सहावर पुणे जिल्हा पतसंस्था फेडरेशन च्या माध्यमातून प्रगती ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या थकीत कर्जदारांसाठी जाहीर समन्स प्रसिद्ध झाले आहे. या जाहीर समन्स मध्ये अनुक्रमांक ३ मध्ये दावा क्रमांक ३७८/२०२६ ऐवजी ३८६ असा नजरचुकीने प्रसिद्ध झाला आहे. तो ३७८/२०२६ असा वाचावा. तसेच अनु. क्रमांक ४ मध्ये पर्भुणी विनायक काळे ऐवजी पदिनी विनायक काळे असे नजरचुकीने प्रसिद्ध झाले आहे, सदर नाव पर्भुणी विनायक काळे असे वाचावे, तसेच यांचा दावा क्रमांक ३८६/२०२६ असा नजरचुकीने प्रसिद्ध झाला आहे, मात्र सदर दावा क्रमांक ३७८/२०२६ असा वाचण्यात यावा. अनुक्रमांक ५ मध्ये जयश्री नामदेव विचकुले यांचा दावा क्रमांक ३८६/२०२६ ऐवजी ३७८/२०२६ असा वाचावा.तसेच अनुक्रमांक १२ मधील तुषार तानाजी कोकरे व अनुक्रमांक १३ मधील ऋतुजा सागर शितोळे यांची दावा रक्कम १७,६७५/- ऐवजी १७,७६५/- अशी नजरचुकीने प्रसिद्ध झालेली आहे, सदर रक्कम १७,६७५/- अशी वाचावी. तसेच अनुक्रमांक ३० मधील शुभम अनिल मदने यांचा दावा क्रमांक ३९६/२०२६ ऐवजी ४९६/२०२६ असा नजरचुकीने प्रसिद्ध झाला आहे, तो दावा क्रमांक ३९६/२०२६ असा वाचावा. तसेच अनुक्रमांक ४५ व ४६ मधील अरुण प्रल्हाद लवटे व रुपाली अरुण लवटे यांची दावा रक्कम ७७,३२३/- ऐवजी ७७,७२३/-अशी नजरचुकीने झालेले आहे. सदर दावा रक्कम ७७,३२३/- अशी वाचावी. तसेच अनुक्रमांक ५१ मध्ये रमेश गणपत तावरे, मु .पो. मोरगाव, ता. बारामती, जि. पुणे ऐवजी रामेश्वर भाऊसो तावरे, मु. पो. चांदगुडेवाडी, पो . मोरगाव, जि.पुणे असे नजर चुकीने प्रसिद्ध झाले आहे, सदर नाव रमेश गणपत तावरे, मु .पो. मोरगाव, ता. बारामती, जि. पुणे असे वाचावे. तसेच अनुक्रमांक ६३ मध्ये अनिल बबन मदने ऐवजी अनिता बबन मदने असे प्रसिद्ध झाले आहे, मात्र ते अनिल बबन मदने असे वाचावे.

पुणे महानगरपालिका

जाहिर प्रकटन

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एमयुएम-२०१७/प्र.क्र. १०७५/नवि-१७, दिनांक २९ जून २०१९ अन्वये नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील कत्तलखाने बंद ठेवण्याबाबतचे निर्णय मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४०६ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४६६, महाराष्ट्र नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम २६६ (२) मधील तरतुदी तुसार शासन निर्णयानुसार पुणे महानगरपालिकेने मा.मुख्य सभा ठ.क्र.५८५ दि. २०/१२/२०१३ अन्वये शुक्रवार दि. २५/०९/२०२६ रोजी अनंत चतुर्दशी (गणपती विसर्जन) असल्याने कोंढवा कत्तलखाना बंद ठेवण्यात येणार आहे.

तरी शुक्रवार दि. २५/०९/२०२६ रोजी अनंत चतुर्दशी (गणपती विसर्जन) असल्याने सदर दिवशी कत्तलखाना बंद राहणार असून सदर दिवशी व्यवसायिकांना जनावरे कटाईचे पास दिले जाणार नाहीत, तसेच कोणीही पशुहत्या करु नये, सदर दिवशी मांस विक्रीच्या दुकानादारांनी मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याबाबतचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

सही/-
डॉ. निना बोराडे
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/८६० दि. २२/०९/२६

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that **Late Shri Prakash Nana More** passed away on **16/04/2021**. During his lifetime, he along with **Mr. Yogesh Prakash More** co-owned and possessed the residential property being **Flat No. 1102, 'A' Wing, 11th Floor (admeasuring 63.26 Sq. Mtrs. built-up area)** in the building/society known as **"NB Pearl Co-operative Housing Society Ltd. (Phase 2)"**, situated at S. No. 55/5/6/1/2, Near Paujai Mandir, Vadgaon Budruk, Taluka Haveli, Pune – 411 041, registered vide Document No. 296/2021 at the office of Sub-Registrar of Assurances, Haveli-2, Pune.

The deceased died intestate leaving behind the following surviving legal heirs:

1. **Smt. Poonam Prakash More** (Wife)
2. **Mr. Yogesh Prakash More** (Son)
3. **Ms. Reshma Prakash More** (Daughter)

Any person, entity having or claiming any right, title, interest, claim, demand, or objection against the deceased's share or the proposed transmission/transfer by way of inheritance, gift, sale, lease, trust, maintenance, dispute, or otherwise, is hereby required to lodge the same in writing along with supporting documentary evidence at the office/chamber address mentioned hereinabove within 7 (Seven) days from the date of publication hereof.

If no claim or objection is received within the stipulated period of 7 days, it shall be deemed and construed that no such claim, right, or encumbrance exists, or that the same has been waived, relinquished, and abandoned. The transfer and mutation proceedings shall thereafter be completed without any further reference to any such claimant.

Sd/-
ADV. MANISHA K. KESWANI
Advocate for Legal, B.Com, LLB O. T. Section,
Office No. 26A, Twin Complex, Ulhasnagar 421 004.
Mob: 8655492192/9619626811

Place: Pune
Date: 21/09/2026

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम)
'मेट्रो भवन', व्हीआयपी रोड, दीक्षाभूमी जवळ,
रामदासपेठ, नागपूर-440010.
टेलिफॅक्स : 0712-2812300, वेबसाईट : www.mahametro.org

शुद्धिपत्रक

Advertisement No. MAHA-Metro/N/HR/05/2026 दिनांक-10.08.2026

उपरोक्त जाहिरातीतील अनुभव विषयीच्या कलम 05 मध्ये शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच, अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख **09.10.2026** पर्यंत वाढवण्यात येत आहे.

सविस्तर तपशील महा मेट्रोच्या **www.mahametro.org** या संकेतस्थळावर **'Career'** या टॅबअंतर्गत उपलब्ध आहे.

टीप: जाहिरातीमधील इतर सर्व अटी व शर्ती यथावत राहतील.

महाव्यवस्थापक (मानव संसाधन), महा-मेट्रो

Nagpur Metro : A Safe Journey

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

माहेश्वरी उद्यान, माटुंगा शाखा, ४६७-अ, व्होरा भवन, माटुंगा, मुंबई - ४०००१९
ई-मेल : Dbmatu@Bankofbaroda.bank.in

स्थावर मालमत्तांच्या विक्रीची सूचना परिशिष्ट - ४-अ [नियम ६(२) आणि ८(६) च्या परंतुकानुसार]

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरे अधिनियम, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ मधील नियम ६(२) आणि ८(६) च्या परंतुकासह वाचावी. सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार, गहाणदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदात्याकडे गहाण/भारित असून, तिचा ताबा बँक ऑफ बडोदाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने सुरक्षित कर्जदात्याच्या वतीने घेतलेला आहे. खाली नमूद खात्यातील थकबाकीच्या वसुलीसाठी सदर मालमत्ता "जिथे आहे तिथे", "जशी आहे तशी" आणि "जे काही आहे त्यासह" या तत्त्वावर विकण्यात येईल. कर्जदार/गहाणदार/हमीदार/सुरक्षित मालमत्ता/थकबाकी/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख व वेळ/इसारा रक्कम आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

अ. क्र.	कर्जदार / हमीदार / गहाणदार यांचे नाव व पत्ता	स्थावर मालमत्तेचे सविस्तर वर्णन व माहित असलेले भार, असल्यास	एकूण थकबाकी	१. ई-लिलावाची तारीख २. ई-लिलावाची वेळ (सुरुवातीची वेळ ते समाप्तीची वेळ)	१. राखीव किंमत २. इसारा रक्कम (ईएमडी) ३. बोली वाढीची रक्कम	ताब्याची स्थिती (रचनात्मक / प्रत्यक्ष)	मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ
१	श्री. रिदिर बी. जाधव (कर्जदार) पत्ता : भिका जाधव यांच्या मार्फत, खोली क्र. १८, तळमजला, ना. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई - ४००००५ श्रीमती लता रिदिर जाधव (सह-अर्जदार) पत्ता : भिका जाधव यांच्या मार्फत, खोली क्र. १८, तळमजला, ना. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई - ४००००५	फ्लॅट क्र. ४०५, चौथा मजला, साई सृष्टी अपार्टमेंट, बांधकाम क्षेत्रफळ ६२६ चौ. फूट, गट क्र. ४६५, भैरवनाथ मंदिराजवळ, गाव – वेळू, तालुका – भोर, जिल्हा पुणे – ४१२२०५, या मालमत्तेचा संपूर्ण भाग व हिस्सा. बँकेच्या माहितीनुसार मालमत्तेवरील भार : माहित नाही.	रु. ६२.०३ लाख + लागू न केलेले व्याज + इतर शुल्क	ई-लिलावाची तारीख : २८-१०-२०२६ ई-लिलावाची वेळ : दुपारी २.०० ते सायं. ६.००	राखीव किंमत : रु. १७,४६,५४०.०० इसारा रक्कम : रु. १,७४,६५४.०० बोली वाढीची रक्कम : रु. २५,०००.००	प्रत्यक्ष ताबा	१५-१०-२०२६ सकाळी ११.०० ते सायं. ४.००
२	श्री. रिदिर बी. जाधव (कर्जदार) पत्ता : भिका जाधव यांच्या मार्फत, खोली क्र. १८, तळमजला, ना. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई - ४००००५ श्रीमती लता रिदिर जाधव (सह-अर्जदार) पत्ता : भिका जाधव यांच्या मार्फत, खोली क्र. १८, तळमजला, ना. सावंत मार्ग, कुलाबा फायर स्टेशन, मुंबई - ४००००५	फ्लॅट क्र. ४०६, चौथा मजला, साई सृष्टी अपार्टमेंट, बांधकाम क्षेत्रफळ ६२६ चौ. फूट, गट क्र. ४६५, भैरवनाथ मंदिराजवळ, गाव - वेळू, तालुका - भोर, जिल्हा पुणे - ४१२२०५, या मालमत्तेचा संपूर्ण भाग व हिस्सा. बँकेच्या माहितीनुसार मालमत्तेवरील भार : माहित नाही.		ई-लिलावाची तारीख : २८-१०-२०२६ ई-लिलावाची वेळ : दुपारी २.०० ते सायं. ६.००	राखीव किंमत : रु. १७,४६,५४०.०० इसारा रक्कम : रु. १,७४,६५४.०० बोली वाढीची रक्कम : रु. २५,०००.००	प्रत्यक्ष ताबा	१५-१०-२०२६ सकाळी ११.०० ते सायं. ४.००

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तीसाठी कृपया खालील वेबसाइटला भेट द्या : https://www.bankofbaroda.in/e-auction ऑनलाइन लिलाव पोर्टल : https://baanknet.com इच्छुक बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात : ९५४९११४८९९ / ८६५२६३९८३९

दिनांक : २२-०९-२०२६
ठिकाण : मुंबई

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा